# सायबर सुरक्षेविषयी सर्वांनी जागरूक राहावे: डॉ. गौतम कांबळे

# सोलापूर विद्यापीठात क्विक हिल फॉउंडेशनतर्फे कार्यक्रम

दैनिक लोकशाही मतदार

सोलापूर- आता सर्वच क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढलेला आहे. प्रत्येक जण मोबाईलचा वापर करत आहेत. त्यामुळे ऑनलाईन फसवणुकीचे प्रकार देखील वाढत आहेत, अशा वेळी सर्वांनीच सायबर सुरक्षेविषयी जागरूक राहावे, असे आवाहन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू गौतम कांबळे यांनी केले.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुल व क्विक हिल फॉउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने २०१७-१८ पासून ''सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा'' हा उपक्रम राबविला जातो. या उपक्रमामध्ये संकुलातील संगणकशास्त्र व एमसीए विभागातील विद्यार्थ्यांना क्विक हिल फॉउंडेशनमार्फत सायबर सेक्युरिटीचे प्रशिक्षण दिले जाते. सोमवारी या प्रशिक्षणचे उदघाटन विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. गौतम कांबळे यांच्या हस्ते झाले.




यावेळी क्विक हिल फॉउंडेशनच्या वरिष्ठ कार्यकारी अधिकारी सुगंधा दानी, सोलापूर सायबर पोलिसचे वसीम शेख व प्रांजली काळे यांनी हे प्रक्षिक्षण दिले. संकुलातील १५० विद्यार्थी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला. प्रक्षिणानंतर क्विक हिल फौंडेशनकडून काही विद्यार्थ्यांची सायबर वॉरियर्स म्हणून निवड केली. हे सायबर वॉरियर्स जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयांना भेटी देऊन विद्यार्थ्यांमध्ये व्याख्यानाद्वारे सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणार आहेत. या सायबर वॉरियर्सना क्विक हिल फौंडेशनकडून विद्यावेतन दिले जाते. मागील पाच वर्षात या सायबर वॉरियर्सनी सोलापूर जिल्ह्यातील व्याख्यानाद्वारे १५७१६५ विद्यार्थ्यांमध्ये सायबर सेक्युरिटीबद्दल जागरूकता केली.या कार्यक्रमासाठी संकुलाचे संचालक प्रा व्ही. बी. घुटे, सायबर पोलीस सोलापूरचे श्रीशैल गाजा, नागेश इंगळे, मछिंद्र राठोड, सचिन अंबालगी तसेच संकुलातील डॉ. आर. एस. मेंते, डॉ एस डी राऊत , डॉ जे डी माशाळे, श्री सी जी गार्डी, श्री बी. डी. चेंडगे आदी शिक्षकवर्ग व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. शेवटी डॉ. अशोक शिंदे यांनी सर्वांचे आभार मानले. चरिता जवळकोटी या विद्यार्थिनीने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.